# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २६९ - २२ दिनांक ०२/०९/२०२२

## मोबाईल चोरी करुन व्हाटसअॅपव्दारे महिलांना अश्लिल मेसेज पाठविणा-या इसमास जेरबंद-मध्यवर्ती गुन्हे शाखेची कारवाई.

मिरा-भाईन्दर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील विरार पोलीस ठाणे हद्दीत एका अनोळखी इसमाने वयस्कर इसमास घरी सोडण्याचे बहाण्याने घरात जाऊन फिर्यादीचे घरातील मोबाईल फोन चोरी करुन मोबाईलचे लॉक खोलुन व्हाटसअॅप स्टेस्टसवर अश्लिल फोटो ठेवुन, त्यांची मैत्रिणचे मोबाईलवर अश्लिल फोटो पाठवुन महिलेच्या मनात लज्जा उत्पन्न करुन विनयभंग केला म्हणुन विरार पोलीस स्टेशन पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ७६३/२०२२ भादविक ३८०, ३५४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर दाखल गुन्हयाचा समांतर तपास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा करीत होती.

सदरचा प्रकार महिलासबंधी गंभीर स्वरुपाचा गुन्हा असल्याने वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचानाप्रमाणे तपास पथकाने तात्काळ गुन्हयाच्या घटनास्थळी भेट देवुन माहिती प्राप्त केली. प्रथम दर्शनी सदरचे अश्लील मेसेज हा फिर्यादीचे मोबाईलवर स्टेटसला ठेवला व आपले मैत्रीनीला अश्लील मेसेज पाठविला असल्याचे दिसून आल्याने गोंधळाची स्थिती झाली होती. सदरचे अश्लिल मेसेज हे कोणी पाठविले याबाबत काहीएक माहिती उपलब्ध होत नव्हती. सपोनि/दत्तात्रय सरक, पो.ना संग्राम गायकवाड, पो.शि महेश वेल्हे, सुशील पवार यांनी गोपनीय माहिती व तांत्रीक विश्लेषण करुन अनोळखी इसमाने चोरी केलेल्या मोबाईल फोनचा वापर करुन सदरचा प्रकार केलेला असल्याचे निष्पन्न झाले. त्या अनोळखी इसमाने चोरी केलेला मोबाईल फोन बंद करुन परागंदा झाला होता. सदर अनोळखी इसमाबाबत हद्दीत शोध घेवुन तपास पथकाने विरार पुर्व येथील मनवेल पाडा तलावासमोरील जिल्हा परिषद शाळेचे समोर सापळा रचुन इसम नामे विकास धिरु कावीठिया, राह. शनीमंदिरच्या पाठीमागे, बावडी जवळ, घास कोपरी, स्मशान रोड, चंदनसार, विरार पुर्व यास ताब्यात घेवुन त्याचेकडुन गुन्हयात चोरी गेलेला मोबाईल फोन हस्तगत करण्यात आला आहे. त्याचेकडे केलेल्या चौकशीत सदरचा प्रकार हा त्याने केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यास पुढील कार्यवाहीकामी विरार पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री विजयकांत सागर, पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय), अति. कार्य. पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.नि. राहुल राख, सपोनि/दत्तात्रय सरक, सपोनि/नितीन बेन्द्रे, पोहवा/ गोविंद केंद्रे, राजाराम काळे, शिवाजी पाटील, पोअं/महेश वेल्हे, सुशील पवार, संग्राम गायकवाड, अनिल नांगरे यांनी केलेली आहे.

------ oooo ------